# स्मार्ट प्रकल्पातून कृषी व्यवसाय व ग्राम परिवर्तन

मा.श्री. सुहास दिवसे,
कृषी आयुक्त, महाराष्ट्र राज्य

- - - - -

मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प अर्थात स्मार्ट हा अत्यंत वेगळी वाट चोखाळमारा, वेगवेगळ्या शक्यतांची चाचपणी करणारा, आत्तापर्यंत शेतकऱ्यांसाठी ज्या पातळीवर व ज्या व्यापकतेने काम झालं नाही असा वेगळा प्रकल्प यातून राबविण्यात येत आहे.

नेहमीच्या इतर योजनांचे आधी धोरण ठरते व त्यानुसार योजना निश्चित होवून ठरल्या चौकटीत अंमलबजावणी होते. स्मार्ट या उलट काम करतो. प्रकल्प यशस्वी करण्यासाठी स्मार्ट मदत करतो. स्मार्टचे काम इव्हिडन्स बेस पॉलिसी नुसार चालते. मार्केटमध्ये जे चालते व लवचिकता आहे ते स्मार्ट मध्ये केले जाते. महिला गट, शेतकरी गट, शेतकरी उत्पादक कंपन्या, उत्पादक संघ आदी सर्व समुदाय आधारीत संस्थांची क्षमता बांधणी हा याचा महत्वाचा भाग आहे.

मुल्य साखळी विकास हा स्मार्ट प्रकल्पाचा आत्मा आहे. लहान व सिमांत शेतकरी आणि नवउद्योजकांना केंद्रस्थानी सर्वसमावेशक व स्पर्धात्मक मुल्यसाखळयां विकसित करणे हे या प्रकल्पाचे उद्दीष्ट आहे. स्मार्टची दिशा ही आता कृषी विभागाची दिशा आहे. कृषी विभागाच्या सर्व योजना त्या दिशेनेच राबविण्यात येत आहेत. त्यासाठी कृषी विभागाची सर्व यंत्रणा, सर्व योजना पुरक काम करत आहेत. कृषी विभाग गेल्या दीड दोन वर्षापासून पिकनिहाय क्लस्टर बेस काम करत आहे. या क्लस्टरचे जीआय आधारीत नकाशे तयार करुन ते मॅप स्मार्ट प्रकल्पाशी जोडण्यात येत आहेत.

मुल्यसाखळी म्हणजे शेतमालाच्या उत्पादनापासून उपभोगापर्यंत सर्व कार्यांची व ती कार्ये करणाऱ्या सर्व घटकांची साखळी. उत्पादित शेतमाल शेतकऱ्यापासून ग्राहकांपर्यंत पोचण्याच्या प्रक्रियेत किमतीत वाढ होत जाते. या प्रक्रियेत ग्राहक मोजत असलेल्या रकमेत उत्पादकाचा हिस्सा वाढवणे, मुल्य साखळीत सहभागी घटकांत समन्वय साधून त्यांची कार्यक्षमता वाढवणे, विश्वास व फायद्याचे वातावरण निर्माण करुन मुल्यसाखळी स्पर्धाक्षम करण्याचे उद्दीष्ट आहे. यासाठी साखळीतील प्रत्येक घटकाची, यंत्रणांची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली आहे. कुणी, कधी, काय काय केलं हे सर्व साखळीतील प्रत्येकाला व ग्राहकालाही पाहता येईल अशी व्यवस्था विकसित करत आहोत.

उत्पादनवाढ व बाजारपेठ काबीज करण्यासाठी आवश्यक त्या सर्वाचा समावेश स्मार्टमध्ये आहे. इतर योजनांमधून उपलब्ध असलेल्या सुक्ष्म सिंचनासारख्या गोष्टी यात वगळण्यात आल्या आहेत. मात्र अपवादात्मक स्थितीत ज्यांचाही विचार होऊ शकतो. दुध व ऊस यांच्या मुल्यसाखळी चांगल्या असल्याने सध्या तरी त्यांचा समावेश स्मार्ट मध्ये नाही.

राज्यातील 1700 हून अधिकच्या शेतकरी उत्पादक कंपन्या (FPC), 220 महिला बचत गट प्रभाग संच, 406 लोक संचालित साधन केंद्र, प्राथमिक कृषी पतसंस्था, उत्पादक संघ, आत्मा यंत्रणेकडे नोंदणी झालेले उत्पादक गट, व्हीएसटीएफ गावसमुह या प्रकल्पाचा लाभ घेऊ शकतात.

सुमारे 2100 कोटी रुपयांच्या अर्थसहाय्याचा हा प्रकल्प 2020-21 ते 26-27 अशी सलग 7 वर्ष राबविण्यात येणार आहे. यासाठी जागतिक बँकेकडून 1470 कोटी रुपये कर्ज उपलब्ध होणार आहे. राज्य शासन यात 560 कोटी रुपयांचा वाटा उचलणार असून खासगी उद्योग क्षेत्राच्या माध्यमातून (CSR) 70 कोटी रुपये उपलब्ध होणार आहेत. यातून संस्थात्मक कृषी व्यवसाय सुधारणा व क्षमतावृद्धीसाठी 282.6 कोटी रुपये, कृषी संलग्न व्यवसाय वृद्धी व व्यापक बाजारपेठ प्रवेशासाठी 1415.4 कोटी रुपये, जोखिम व्यवस्थापन यंत्रणा निर्मितीसाठी 129.4 कोटी रुपये आणि या प्रकल्पाच्या अंमलबजावणी व्यवस्थापनासाठी 276.6 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

कृषी व्यवसाय सुधारणांमध्ये कृषी व पणन विभागांअंतर्गतच्या विविध संस्थांच्या क्षमतांचे बळकटीकरण, धोरणात्मक बदलांसाठीच्या उपाययोजना, स्टुअर्डशीप काऊंसील स्थापना यांचा समावेश आहे. बाजारपेठ प्रवेशासाठी विविध प्रकारच्या भागिदाऱ्या, सार्वजनिक सुविधांमध्ये गुंतवणूक, संस्थांची क्षमता बांधणी, तांत्रिक सहाय्य, शहरांना अन्न पुरवठा व्यवस्था व पतपुरवठा उपलब्धता यावर भर देण्यात येत आहे. तर जोखिम व्यवस्थापन यंत्रणेत बाजार माहिती व विश्लेषण सेवा, धान्य गोदाम व्यवस्था, बाजार मुल्य जोखीम व्यवस्थापन आदी बाबींचा समावेश आहे.

ट्रेसेबिलीटी हा या प्रकल्पाचा महत्वाचा भाग आहे. कापूस असो की फळे वा भाजीपाला. मी घेत असलेली वस्तू उत्कृष्ट आहे. तिची गुणवत्ता मी तपासू शकतो हा विश्वास ग्राहकाच्या मनात निर्माण करण्यावर, गुणवत्तेची हमी देण्यावर यात भर आहे.

कृषी, पशुसंवर्धन, पणन, सहकार, महिला व बाल कल्याण, ग्रामविकास, नगर विकास या सर्व विभागांच्या विविध यंत्रणांच्या समन्वयाने प्रकल्पाची अंमलबजावणी होत आहे. राज्याच्या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील प्रकल्प सुकाणू समिती व कृषी सचिवांच्या अध्यक्षतेखालील स्मार्ट सोसायटीमार्फत स्मार्ट राबविण्यात येत आहे. प्रकल्प संचालक म्हणून कृषी आयुक्त काम पाहत आहेत. विभागिय पातळीवर विभागिय कृषी सहसंचालक व जिल्हा पातळीवर जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी प्रकल्पाचे काम पाहत आहेत.

**- सुअर्डशीप काऊंसील (कारभारी परिषद)**

स्टुअर्डशीप काऊंसील विविध देशांमध्ये कार्यरत आहेत. मुल्य साखळीतील सर्व घटक एकत्र येवून त्या त्या पिकाच्या उत्पादनापासून मिळणाऱ्या उत्पन्नात सर्व घटकांचा वाटा वाढविण्याच्या अनुषंगाने त्यामार्फत प्रयत्न केले जातात. अशा काही काऊंसील महाराष्ट्रात स्थापन करण्याचा विचार आहे. या संस्था स्वतःच्या जोरावर चालतील. पहिली काही वर्ष त्यांना मदत केली जाईल.

**- शेतकरी सहभाग**

शेतकरी संस्थांना या प्रकल्पात खरेदीदारांसोबत भागिदारी प्रकल्प, बाजारपेठ संपर्क वाढ, धान्य साठवणूक व साठवणूक पश्चात धान्य तारण आणि या बाबींना पुरक नाविन्यपुर्ण बाबींसाठी सहाय्य मिळणार आहे. कापूस उत्पादकतावाढीसह गुणवत्तापूर्ण, एकजिनसी कापूस विक्रीव्यवस्था उभारण्यासाठी कापूस मुल्यसाखळी विकास प्रकल्प(स्मार्ट कॉटन) राबविण्यास सुरवात झाली आहे.

**- शेतकरी संस्था निकष व अनुदान**

संस्था नोंदणीकृत असावी, वार्षिक उलाढाल किमान 5 लाख रुपये असावी व संस्था थकबाकीदार नसावी. उत्पादक भागिदारीसाठी संस्थेचे किमान 250 शेतकरी भागधारक असावेत, बाजार संपर्कवाढीसाठी फळे-भाजीपाला उपप्रकल्पासाठी 750 लाभार्थी शेतकरी तर धान्य आधारीत उपप्रकल्पासाठी किमान 2000 लाभार्थी शेतकरी असावे लागतात. प्रकल्प खर्चानुसार जास्तीत जास्त 60 टक्क्यांपर्यंत अनुदान देण्यात येणार आहे. लाभार्थी संस्था निवडीची प्रक्रिया खूप स्पर्धात्मक, तटस्थ व त्रयस्थ संस्थेमार्फत निपक्षपाती आहे. हा जागतीक पातळीवरील प्रकल्प आहे. जागतिक स्पर्धेला पात्र अशाच लाभार्थी निवड यात केली जाते.

**- सहाय्य मिळणाऱ्या बाबी**

गुणवत्तापूर्ण उत्पादनासाठीच्या बाबी, ट्रॅक्टर, ट्रॉली, बीबीएफ यंत्र, फवारणी यंत्र, हार्वेस्टर, हळद लागवड-काढणी-उकळणी-पॉलीश यंत्र, प्रयोगशाळा, वजनकाटे आदी यंत्र व औजारे, गोदाम, शेतमाल संकलन केंद्र, काढणीपश्चात पायाभूत सुविधा, शेतमाल प्रमाणीकरण, माती परिक्षण यासाठी यातून सहाय्य दिले जात आहे. शेतकऱ्यांना आवश्यक त्या बाबीस सहाय्य करण्याची लवचिकता यात आहे. नवीन वाणाची आयात करण्यासाठी 25 कोटी रुपयांची विशेष तरतूद यात आहे. याशिवाय मुल्य साखळीत ज्या बाबींना अनुदान प्रस्तावित नही अशा नाविन्यपूर्ण बाबींसाठी खर्चाच्या 50 टक्क्यांपर्यंत अनुदान देय आहे. यासाठी 20 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

**- मुल्य साखळी विकास शाळा**

मुल्यसाखळीतील सर्व घटकांना एका व्यासपीठावर आणून त्या पिकासंबंधित आव्हाने आणि मुद्दे समजून घेण्यासाठी मुल्य साखळी विकास शाळा ही संकल्पना राबविण्यात येणार आहे. यात तांत्रिक बाजार बैठक, बाजाराभिमुख पीक प्रात्यक्षिके, राज्य, देश आणि देशाबाहेरील प्रशिक्षण वा अभ्यास दौरे, शेतकरी शेतीशाळा, तांत्रिक कर्मचाऱ्यांसाठी आंतरराष्ट्रीय अभ्यास दौरे यांचा समावेश आहे. यासाठी 14 आंतरराष्ट्रीय संस्थासोबत करार करण्यात येत आहेत. नेदरलॅन्डमधील संस्थेसोबत मुल्यवर्धनाबाबत काम सुरु झाले आहे. इक्रिसॅटच्या संस्था, एफएओ यासह काही संस्थांसोबत सामंजस्य करार झाले आहेत.

**- लाभार्थी संस्था निवड प्रक्रिया**

प्रकल्पात सहभागी होण्यासाठी शेतमाल खरेदीदार व शेतकऱ्यांकडून प्रस्ताव मागविण्यात येतात. यासाठी वृत्तपत्रे व इतर माध्यमांतून जाहिरात दिली जाते. इच्छूकांना प्रकल्पाची संकल्पना कशी तयार करावी याचे प्रशिक्षण दिले जाते. त्यानंतर शेतकरी संस्था व खरेदीदार सल्लागाराच्या मदतीने प्रकल्पाची आखणी करतात. त्याची सामाजिक, पर्यावरणीय व तांत्रिक तपासणी केली जाते. यानंतर पात्र प्रकल्प संकल्पनांचे त्रयस्थ मुल्यांकन समितीमार्फत मुल्यांकन केले जाते. मंजूरी मिळालेल्या संकल्पनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) प्रकल्प सल्लागार संस्थेमार्फत तयार करण्यात येतो.

**- पतपुरवठ्यासाठी मदत**

स्मार्ट अंतर्गत उपप्रकल्पांसाठी पतपुरवठा सुरळित व्हावा यासाठी संस्थांना वेगवेगळ्या माध्यमातून मदत करण्यात येणार आहे. कमी, अल्प दरात कर्जपूरवठा करण्याचा प्रयत्न आहे. बँकांसोबत सामंजस्य करार करण्यात येत आहेत. एडीबीचा मॅग्नेट नावाचा प्रकल्प येतो आहे. खरेदीदार कंपन्यांना राष्ट्रीय कृषी विकास योजना व इतर योजनांतून मदतीचा प्रयत्न आहे.

**- स्मार्ट कॉटन**

महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक सहकारी पणन महासंघ आणि कृषी विभागामार्फत शेतकरी गट व जिनिंग मिल्स याच्या सहभागाने 100 कोटी रुपयांचा कापसाच्या मुल्यसाखळी विकासाचा प्रकल्प राबविण्यास सुरवात झाली आहे. कापूस उत्पादक 12 जिल्ह्यांतील 60 तालुके आणि त्यातील 4 लाख शेतकरी कुटुंबाना याचा लाभ होणार आहे.

**- स्मार्ट प्रकल्पात प्रस्तावित पिके व प्रकल्प**

सोयाबीन - 38, कापूस - 5, मका - 17, तूर - 15, हरभरा - 21, इतर डाळी - 12, भरड धान्ये - 8, भात - 8, केळी - 9, डाळिंब - 16, द्राक्ष - 8, संत्रा - 7, मोसंबी - 1, काजू - 8, पेरु - 1, अंजीर - 1, सिताफळ - 1, आंबा - 9, टोमॅटो - 2, कांदा - 25, भेंडी - 2, बटाटा - 2, इतर भाजीपाला - 2, हळद - 2, शेळीपालन - 25, कुक्कुटपालन – 4

**- कृषी विपणन अन्वेषण सेवा**

बाजारभावाच्या अंदाजानुसार आगामी हंगामात कोणती पिके घ्यावीत, काढणीवेळी बाजारभाव अंदाजानुसार शेतमाल विक्री करावा की गोदामात साठवावा याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी कृषी आयुक्तालयात स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात येणार आहे. जागतिक व देशांतर्गत लागवड क्षेत्र, संभाव्य उत्पादन, साठवणूक, मागणी व बाजारभाव यांचे विश्लेषण करुन प्रमुख पिकांच्या संभाव्य बाजारभावांचे अंदाज या कक्षामार्फत शेतकऱ्यांना मोबाईल संदेश, वेबसाईट आदी माध्यमातून पुरविण्यात येणार आहेत.

**- पथदर्शी प्रकल्प स्थिती**

पहिल्या टप्प्यात स्मार्ट प्रकल्पाअंतर्गत पथदर्शी प्रकल्पाची सुरवात डिसेंबर 2018 पासून करण्यात आली. यातील भागीदारी प्रकल्पांसाठी विविध उद्योगसमुहांसोबत 49 सामंजस्य करार करण्यात आले आहेत. कडधान्ये, कापूस, सोयाबीन, मका, फळे, भाजीपाला, मसाला पिके, भरडधान्ये, शेळीपालन व कोंबडीपालन यांच्या मुल्यसाखळी विकासाचे 134.51 कोटी रुपयांचे 31 उपप्रकल्प कार्यान्वित करण्यात आले आहेत. यात 21 जिल्ह्यांतील 85 लाभार्थी शेतकरी संस्थांचा समावेश आहे.

**- सुरु असलेले प्रकल्प**

सोयाबीनसाठी लातूरमध्ये 12 कोटी 98 लाख रुपयांचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. त्यात स्मार्ट गोदाम, ट्रॅक्टर आदी बाबींसाठी 8.33 कोटी रुपये देणार आहे. गुणवत्तापूर्ण उत्पादन, क्वालिटी टेस्टिंग करुन विक्री आदी बाबी यात आहेत. वखार मडामंडळामार्फत तेथे सायलो प्रकल्प उभारण्यात येत आहे. हळदीसाठी हिंगोली मध्ये प्रकल्प सुरु आहे. हळदीतील कुरकुमच्या प्रमाणानुसार लीन ॲग्रो कंपनीमार्फत दर देण्यात येत आहे. कंपनीमार्फत प्रत्येक टप्प्याचे संनियंत्रण केले जाते. याशिवाय बारामतीत डाळिंबासाठी, अमरावतीत तुर, सोया व गहू पिकांसाठी तर राज्यातील 10 पतसंस्थांना गावपातळीवर धान्य गोदामांसाठीचे प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत. गोदामांचे केंद्रीय संस्था प्रमाणीत करुन, मुल्यमापन करुन 100 प्रकल्प करण्याचे नियोजन आहे.

**- पुढील टप्पा ऑगस्टमध्ये**

जागतिक दर्जाच्या प्रकल्पाची आखणी करायला तसा खुप काळ लागतो. आपण हे काम फक्त 9 महिन्यात करुन 31 प्रकल्पांना मंजूरी दिली आहे. त्यांचे काम प्रगतीपथावर आहे. प्रकल्पाच्या पुढील टप्प्यात नवीन प्रकल्पांसाठी ऑगस्टमध्ये जाहिरात काढण्यात येईल. एकदा जाहिरात काढल्यानंतर संस्था निवड व मंजूरीची प्रक्रिया पूर्ण व्हायला सात आठ महिने लागतात. टप्प्या टपप्याने अशा तीन चार जाहिराती येतील.

कृषी व पणन विभागाच्या सहकार्याने कोरोना लॉकडाऊनच्या काळात 90 दिवस दररोज दोन हजार टन भाजीपाला शेतकऱ्यांपासून ग्राहकांपर्यंत थेट पुरवण्यात आला. राज्यातील अनेक शेतकरी उत्पादक कंपन्यांनी, गटांनी यात उल्लेखनिय कामगिरी बजावणी. अशी मुल्यसाखळी आपण तयार करु शकतो, असा विश्वास शेतकऱ्यांमध्ये आला आहे. यामुळे पुढील काळात स्मार्टची व्यापकता व परिणामकारकता वाढत जाईल, असा विश्वास वाटतो.

- - -